


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ३४३ वा बुधवार दि १४ एप्रिल २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये

# मोदींचं नाव घेऊन शहांनी शब्द दिला, तंतोतंत खरा ठरला बिहारमध्ये पहिल्यांदाच भाजपचा बसणार...

**वृत्तसंस्था/ पाटणा**

बिहारमध्ये पहिल्यांदाच भाजपचा मुख्यमंत्री बसणार आहे. सम्राट चौधरी बिहारचे पुढील मुख्यमंत्री असतील. त्यांची भाजपच्या विधिमंडळ गटनेतेपदी नियुक्ती झाली आहे. पाटण्यात केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत चौधरी यांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं. या बैठकीला विजय सिन्हा, मंगल पांडे आणि दिलीप जयस्वालदेखील उपस्थित होते. या बैठकीत सम्राट चौधरी यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवण्यात आला. सम्राट चौधरी थोड्याच वेळात राज्यपाल सय्यद अता हसनैन यांची भेट घेतील आणि सरकार स्थापनेचा दावा करतील. उद्या (१५ एप्रिल) सकाळी ११ वाजता सम्राट चौधरी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतील. त्यांनी नव्वदच्या दशकात राजकीय कारकीर्द सुरु केली. राबडी देवी यांच्या सरकारमध्ये ते सर्वात कमी वयाचे मंत्री होते. यानंतर मांझी सरकारमध्ये त्यांच्याकडे कॅबिनेट मंत्रिपद होतं. पण भाजपमध्ये गेल्यावर त्यांची राजकीय भरभराट झाली. भाजपमध्ये प्रवेश करुन त्यांना अवघी ८ वर्षेच झाली आहेत. या कालावधीत त्यांनी पक्षात आपलं स्थान भक्कम केलं. पक्षातील दिग्गजांना मागे टाकत त्यांनी मुख्यमंत्रिपद मिळवलं आहे. बिहारमध्ये गेल्या वर्षी विधानसभेची निवडणूक झाली. ही निवडणूक नितीश कुमार यांच्या नेतृत्वात लढवण्यात आली. निवडणूक प्रचारात केंद्रीय गृहमंत्री अमित शहादेखील सक्रिय होते. सम्राट चौधरी यांची तारापूर मतदारसंघातून निवडणूक लढवली. त्यावेळी चौधरी यांच्यासाठी शहांनी ३० ऑक्टोबरला



प्रचार सभा घेतली. सम्राटजींना निवडून द्या, मोदीजी यांना मोठा माणूस बनवतील, अशा शब्दांत त्यावेळी शहांनी उपस्थितांना आवाहन केलं होतं. त्यामुळे सत्ता आल्यास चौधरी यांना मुख्यमंत्रिपद मिळेल, असे तर्कवितर्क लढवले गेले. नितीश कुमार यांच्या नेतृत्त्वात एनडीएनं दणदणीत विजय मिळवला. यानंतर कुमार यांनीच मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. सम्राट चौधरी उपमुख्यमंत्रिपदीच कायम राहिले. पण अवघ्या पाच महिन्यांत राजकीय गणितं बदलली. नितीश कुमार यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देत दिल्लीचा रस्ता धरला. त्यामुळे बिहारमध्ये भाजपचा मुख्यमंत्री बसण्याचा मार्ग मोकळा झाला. भाजपनं यासाठी चौधरी यांची निवड केली. त्यामुळे अमित शहांचे शब्द खरे ठरल्याची चर्चा सुरु झाली आहे.

# ठाकरेंची तिसरी पिढी शिवसेनेचे नेतृत्व करणार? आदित्य ठाकरे कार्याध्यक्ष होण्याचे संकेत, लवकरच घोषणा शक्य....

**वृत्तसंस्था/मुंबई**

आधी विधानसभा निवडणुकीत बसलेला धक्का आणि नंतर झालेल्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीत सत्ता राखण्यात आलेल्या अपयशानंतर आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात मोठे फेरबदल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पक्षसंघटनेत प्राण फुंकण्यासाठी युवा नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांच्यावर कार्याध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली जाणार असल्याची चर्चा रंगू लागली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा वर्धापन दिन १९ जून रोजी होणार आहे. या वर्धापन दिनी आदित्य ठाकरे यांची पक्षाचे कार्याध्यक्ष म्हणून घोषणा केली जाऊ शकते. एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या आमदार आणि खासदारांसह बंड करत वेगळी वाट निवडल्यानंतर उद्धव ठाकरे यांना मोठा राजकीय फटका बसला. शिवसेनेत उभी फूट पडली आणि पक्षाचं नाव आणि चिन्हही ठाकरे यांच्यापासून दूर गेलं. पक्षफुटीनंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत ठाकरेंना चांगलं यश मिळालं. मात्र नंतर विधानसभा निवडणुकीत पक्षाची झालेली सुमार कामगिरी आणि मुंबई महानगरपालिकेत पुन्हा सत्ता खेचून आणण्यात आलेल्या अपयशामुळे पक्षसंघटनेत मरगळ आल्याची स्थिती आहे. या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण करण्यासाठी आणि पक्षसंघटन मजबूत करण्यासाठी आदित्य ठाकरे यांच्या रुपाने युवा नेतृत्व देण्याचा प्रयत्न शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून केला जाणार असल्याचे समजते. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या संघटनात्मक कामात मागील काही दिवसांपासून आदित्य ठाकरे कमालीचे सक्रिय झाले आहेत. शिवसेना भवन इथं होणाऱ्या जिल्हाप्रमुख आणि विभागप्रमुखांच्या बैठकांना उपस्थित राहत ते संघटनेवर आपली पकड मजबूत करत असल्याचं दिसत आहे. आधी अशा बैठकांना आदित्य ठाकरे यांची नियमित उपस्थिती दिसत नसत. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातच अशा बैठक होत होत्या. मात्र आता आदित्य ठाकरे हे सर्व संघटनात्मक बैठकांना जातीने उपस्थित राहात असल्याने नव्या जबाबदारीसाठी ते सज्ज झाल्याचे संकेत मिळत आहेत. महानगरपालिका निवडणुकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला सत्ता राखण्यात अपयश आलं असलं तरी विपरीत परिस्थितीतही पक्षाने समाधानकारक जागा मिळवल्या होत्या. या निवडणुकीत आदित्य ठाकरे हे पक्षाचा अजेंडा लोकांपर्यंत पोहोचवण्यात अग्रभागी राहिले होते.

# अभिनयाचे रंगतेच, मंच बदलते!...



ङ्गरथचक्रफ नाटक करत असतानाच मला ङ्गगांधीफ चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली. मग रथचक्रचे प्रयोग थांबवावे लागले. गांधी केल्यानंतर मग मी छबिलदासला प्रायोगिक रंगभूमीवर ङ्गमेडियाफ हे नाटक केलं. मग माझी हिंदी चित्रपटांची, परभाषी चित्रपटांची कामं सुरू झाली. मग मराठी नाटक मागेच पडलं. इथं एक सांगावसं वाटतं, की जरी मी मराठी रंगभूमीवर वावरत नव्हते तरी माझी नाटकाशी नाळ तुटलेली नव्हती. मी गुजराती रंगभूमीवर अभिनय करत होते. १९८२मध्ये माझं पहिलं व्यावसायिक गुजराती नाटक आलं ङ्गसर्पनादफ नावाचं. मी जेव्हा ङ्गलपंडावफ नाटकात काम करत होते तेव्हाच मला त्या नाटकाचे दिग्दर्शक अरविंद ठक्कर यांनी सांगितलं होतं, की ङ्गमैं तुम्हे गुजराती रंगभूमी पर ले जाऊँगाफ मी म्हटलं होतं, ङ्गमला गुजराती येत नाहीफ ते म्हणाले, ङ्गमैं सिखाऊँगा.फत्यांनी मला १९८२मध्ये ङ्गसर्पनादफ्साठी विचारलं. तेव्हा असीम अगदीच लहान होता. त्यावेळी गुजराती नाटकं शनिवार-रविवार व्हायची. आठवड्यातल्या दिवसांत फारसे प्रयोग नसायचे. मग शनिवार-रविवार अमुक वेळेनंतर मी शूटिंग करणार नाही अशी काहीबाही जुळणी करून मी गुजराती नाटक करत होते. त्यानंतर बरीच नाटकं झाली. आयएनटीचं ङ्गतहोमतफ नावाचं गुजराती नाटक केलं. मग ङ्गकुँवर वेल्लारे पधारजोफ केलं. त्याआधी ङ्गसीमाचिन्हफ केलं. मराठी ङ्गअग्निपंखफ नाटकाचं गुजराती ङ्गजुगलबंदीफ नाटक केलं. सुरुवातीला गुजराती बोलताना खूप तारांबळ व्हायची. मला ती भाषा यायची नाही आणि त्या भाषेबद्दल मला काहीच माहीत नव्हतं. त्यातही गंमत अशी होती, की मी गुजराती वाचू शकत असे! पण बोलता येत नव्हतं. त्याचं असं झालं होतं, मी कॉलेजमध्ये असताना व्हॉलीबॉल टीममध्ये होते. व्हॉलीबॉलच्या स्पर्धा अहमदाबादला असायच्या. त्यावेळेस ङ्गकोका कोलाफ हे पेय खूप प्रसिद्ध होतं. त्याची अहमदाबादेत गुजरातीत जाहिरात लावलेली होती. मी ते ङ्गडोडा डोलाफ असं वाचलं! मग तिथल्या लोकांनी मला सांगितलं, त्या ङ्गडफ्मध्ये एक छोटी रेघ आहे पाहा, तो गुजरातीतला ङ्गकफ आहे. पुढे लग्नानंतर मी वडाळ्याला राहायला आले. तिथं गुजराती वस्ती होती. लाँड्रीतून कपडे आणताना म्हणा किंवा आणखी काही कारणांनी म्हणा, गुजरातीशी संबंध यायला लागला. पण मला गुजराती हाती लिहिलेलं वाचता यायचं नाही, टायपिंग केलेली अक्षरं कळायची. गुजराती नाटकांत कामं करायला लागल्यावर मी त्यांना सांगायचे मला संवाद गुजरातीच द्या, फक्त ते टाइप केलेले द्या, मला वाचता येतात. त्यामुळे पहिल्या नाटकापासून माझं स्क्रिप्ट गुजरातीतच असायचं. नव्याने भूमिका करायला लागल्यावर संवादाची सुरुवात गुजरातीत व्हायची आणि शेवट हिंदीतल्या क्रियापदानं व्हायचा! पहिला शब्द आठवला की संवादाची गाडी वेगात पुढे जायची, पण पहिला शब्द आठवला नाही की मी स्तब्ध होऊन जात असे. हळूहळू जमायला लागलं. जवळजवळ १७ वर्षांनी मराठीत आले ती ङ्गआई तुला कुठे ठेऊफ या नाटकाने. अशोक पाटोळेंचं हे नाटक पुरुषोत्तम बेर्डे यांनी दिग्दर्शित केलं होतं. पण ते काही कारणांनी फार चाललं नाही. २०१३नंतर जेव्हा मी गुजराती रंगभूमीवर पुन्हा आले तेव्हा मला हेच नाटक मिळालं होतं! हे नाटक गुजरातीत पुनर्लेखन करताना ते अधिक फुलवलं गेलं होतं. त्या नाटकाचे गुजरातीत आम्ही २५० प्रयोग केले होते. ङ्गबा तने हूँ क्याँ राखू?फ असं त्याचं गुजराती नाव होतं. अशोक पाटोळेंना क्रेडिटही देत होते. मग ङ्गमम्मी मारी माइंड ब्लोइंगफ हे नाटक केलं. २०१९मध्ये आपल्या मोलकरीण चित्रपटावर आधारित गुजराती ङ्गनोकरानीफ हे नाटक केलं. पण ते लॉकडाऊनमध्ये बंद पडलं. मला आठवतंय, आम्ही या नाटकाचा अहमदाबाद दौरा आटोपून मुंबईत आलो होतो. लगेचच ङ्गबाईपण भारी देवाफ चित्रपटातल्या शेवटच्या डान्सची रिहर्सल होती आणि त्यानंतर १८-१९ मार्च आमचं त्याचं शूट होतं. नेमकं तेव्हाच लॉकडाऊन जाहीर झालं. चित्रपटाचं अक्षरशः शेपूट राहिलं होतं. पण ते सगळंच दोन वर्षं बंद पडलं. करोना संकट गेल्यावर आम्ही तो चित्रपट पूर्ण केला. एक दिवस चंद्रकांत कुलकर्णी आला. त्यानं ङ्गचारचौघीफ नाटकात काम करणार का, असं विचारलं. मी जणू वाटच पहात होते अशा संधीची. प्रशांत दळवींनी ते इतकं जबरदस्त लिहिलंय की तुम्हाला इम्प्रोव्हाइज करायलाही वाव दिलेला नाहीये. त्यामुळे एखादा संवाद जर आम्ही विसरलो तर पुढचं सगळं विसरायला होईल, इतकी स्क्रिप्टची बांधणी घट्ट आहे. प्रशांतजींचे संवाद जसे लिहिले तसेच बोलावे लागतात. मी, मुक्ता, पर्ण, कादंबरी  आम्ही सगळ्यांनी ते नाटक खूप समरसून केलं, ३३५ प्रयोग झाले. हे नाटक कलाकार म्हणून आणि प्रेक्षक म्हणून तुमच्या मनावर गारूड करतं. मराठी रंगभूमीशी नाळ जणू तेव्हा तुटल्यासारखी झाली होती. ती पुन्हा जोडली गेली. नाटकात दिग्दर्शकाने दाखवून दिलेल्या हालचालींपेक्षा काहीही वेगळं करायचं असेल तर ते आधी त्या दिग्दर्शकाला विचारायचं. त्याच्या मते, ती एखादी हालचाल किंवा अतिरिक्त संवाद त्या भूमिकेला अधिक उठाव देण्यासाठी योग्य असेल तरच पुढच्या प्रयोगात करायचा, अन्यथा नाही, हा मी माझ्यासाठी घालून दिलेला दंडक आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

## इराणचा अमेरिकेला इशारा; होर्मुझ सामुद्रधुनीतील व्हिडीओ केला शेअर

# '..तर तुम्हाला लक्ष्य केलं जाईल'

■ इस्लामाबाद/वृत्तसंस्था

अमेरिका आणि इराणमधील युद्ध आता आणखी भडकण्याची चिन्ह निर्माण झाली आहेत. याचं कारण म्हणजे युद्धविरामानंतर इस्लामाबादमध्ये शांतता चर्चा पार पडली. मात्र, या चर्चेत कोणताही तोडगा निघाला नाही. २१ तास चाललेली ही चर्चा निष्फळ ठरली. दरम्यान, ही चर्चा निष्फळ ठरताच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आता इराणला पुन्हा एकदा इशारा देत होर्मुझ सामुद्रधुनीच्या नाकेबंदीचे आदेश दिले आहेत.

यातच दुसरीकडे इराणनेही होर्मुझ सामुद्रधुनीतील एक व्हिडीओ शेअर करत अमेरिकेला इशारा दिला. त्यामुळे पुन्हा एकदा हा संघर्ष चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. इराणने होर्मुझ सामुद्रधुनीतील एक व्हिडीओ शेअर करत अमेरिकेच्या युद्धनौकेला दूर राहण्याचा इशारा दिला. 'जर तुम्ही आदेशाचं पालन केलं नाही, तर तुम्हाला लक्ष्य केलं जाईल', असं इराणने अमेरिकेच्या युद्धनौकांना म्हटलं आहे. दरम्यान, इराणच्या सरकारी वृत्तसंस्थांनी




रविवारी एक व्हिडीओ प्रसिद्ध केला आहे. त्यांच्या दाव्यानुसार हा व्हिडीओ आदल्या दिवसाचं असून त्यामध्ये त्यांचं नौदल अमेरिकेच्या एका युद्धनौकेला इशारा देऊन होर्मुझ सामुद्रधुनीपासून दूर राहण्यास भाग पाडत असल्याचं दिसत आहे. इराणी दूतावासांनी हा व्हिडीओ एक्स हँडलवर शेअर केला आहे. या व्हिडीओबाबत अमेरिकेने अद्याप काही पुष्टी केलेली नाही. पण इराणी वृत्तसंस्थांनी शेअर केलेल्या ६४ सेकंदांच्या व्हिडीओमध्ये इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्समधील एक व्यक्ती असं बोलताना ऐकू येत आहे की, "यूएस नेव्ही वॉरशिप तुम्ही तुमचा मार्ग बदलून ताबडतोब हिंद महासागरात परत जा. जर तुम्ही आमच्या आदेशाचं पालन केलं नाही, तर आम्हाला तुम्हाला लक्ष्य करावं लागेल, हा अंतिम इशारा."

### अमेरिकेने शांतता चर्चेबाबत काय म्हटलं?

जे.डी.व्हान्स यांनी चर्चेनंतर पत्रकारांशी बोलताना बाजू मांडली. इराणने अमेरिकेच्या अटी मान्य न केल्यामुळे कोणताही करार होऊ शकला नाही, असं त्यांनी सांगितलं. जे.डी.व्हान्स म्हणाले, "आम्ही कोणत्याही करारापर्यंत पोहोचलेलो नाही. त्यांनी आमच्या अटी स्वीकारण्यास नकार दिला. प्रदीर्घ चर्चेनंतर अमेरिकेने आपली अंतिम आणि सर्वोत्तम ऑफर दिली होती आणि संपूर्ण वाटाघाटी दरम्यान अमेरिकेच्या शिष्टमंडळाने बरीच लवचिकता दाखवली होती. जे.डी.व्हान्स यांच्या मते मुख्य मुद्दा इराणच्या अणू कार्यक्रमाचाच आहे. तेहरान अण्वस्त्रे बनवणार नाही, याबाबत त्यांनी स्पष्ट आणि दीर्घकालीन वचनबद्धता द्यावी, अशी वॉशिंग्टनची मागणी आहे. "आम्हाला त्यांच्याकडून केवळ आत्तासाठीच नव्हे तर दीर्घकाळासाठी एक सकारात्मक वचन हवं आहे," असंही त्यांनी नमूद केलं.

### शांतता चर्चा फिस्कटताच ट्रम्प यांची घोषणा, होर्मुझच्या नाकेबंदीचे आदेश..

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आता इराणला पुन्हा एकदा मोठा इशारा देत थेट होर्मुझ सामुद्रधुनीच्या नाकेबंदीचे आदेश दिले आहेत. ट्रम्प यांनी म्हटलं की, "होर्मुझ सामुद्रधुनीची नाकेबंदी तात्काळ लागू होईल. मी जगातील सर्वोत्तम असलेल्या अमेरिकेच्या नौदलाला, आंतरराष्ट्रीय जलक्षेत्रात इराणला कोणतंही शुल्क दिलेल्या कोणत्याही जहाजाचा शोध घेऊन त्याला अडवण्याचे निर्देश दिले आहेत. अशा जहाजांना खुल्या समुद्रातून सुरक्षित मार्ग दिला जाणार नाही. तात्काळ प्रभावाने ही प्रक्रिया सुरू केली जाईल", असा इशारा ट्रम्प यांनी दिला.

## काँग्रेसचे ३० आमदार तातडीने दिल्लीला रवाना

■ नवी दिल्ली, वृत्तसंस्था :

गेल्या काही महिन्यांपासून कर्नाटकात मोठ्या राजकीय घडामोडी पाहायला मिळत आहेत. मुख्यमंत्री पदावरून काँग्रेसमधील वाद काही दिवसांपूर्वी चव्हाट्यावर आला होता. कर्नाटक सरकारमधील काही आमदारांनी नवी दिल्लीत जाऊन काँग्रेसच्या हायकमांडची भेट घेतली होती आणि उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांना मुख्यमंत्री करण्याची मागणी करण्यात आल्याचं बोललं जात होतं. मात्र, काँग्रेस हायकमांडने या चर्चा फेटाळून लावल्या होत्या. त्यानंतर आता पुन्हा एकदा कर्नाटकात राजकीय घडामोडींना वेग आला आहे.

कर्नाटक सरकारमधील जवळपास ३० काँग्रेस आमदार बंडाच्या तयारीत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. ३० आमदार एकत्र मिळून तातडीने दिल्लीला रवाना झाल्याची सांगितली जात आहे. हे ३० आमदार एकत्र मिळून काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि राहुल गांधी यांची भेट घेण्याची शक्यता आहे. या संदर्भातील वृत्त एएनआयने दिलं आहे.

दरम्यान, कर्नाटकमधील हे ३० आमदार दिल्लीत जाऊन काँग्रेस हायकमांडकडे कर्नाटक सरकारमधील मंत्रिमंडळ फेरबदलाची मागणी करण्याची शक्यता आहे. तसेच मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या मंत्रिमंडळात फेरबदल करण्यास भाग पाडण्यासाठी पक्षाच्या हायकमांडवर दबाव



आणण्याचा या आमदारांचा या मागचा हेतू असल्याचं बोललं जात आहे. कर्नाटक काँग्रेसचे आमदार अशोक पट्टन यांनी या संदर्भात बोलताना म्हणाले की, "जवळपास ३० आमदार एकत्र आले आहेत. निम्मे आमदार सिद्धरामय्या यांना आणि बाकीचे डी.के.शिवकुमार यांना पाठिंबा देत आहेत असं नाही. मात्र, आमची सर्वांची फक्त एकच मागणी आहे, ती म्हणजे मंत्रिमंडळात फेरबदल. आम्हालाही काही आश्वासने देण्यात आलेले होते. पण आम्हालाही सर्वांना संधी देण्याचं आश्वासन देण्यात आलं होतं. त्यामुळे याची आठवण करून देण्यासाठी आम्ही दिल्लीला आलो आहोत. अर्थातच, आम्ही नाराज आहोत. आम्ही कोणालाही ब्लॅकमेल करत नाहीत. आम्ही फक्त ही मागणी करत आहोत", असं आमदार अशोक पट्टन यांनी म्हटलं आहे.

## 'नमामी' गंगेऐवजी 'क्षमामी' गंगेची गरज : विजय परांजपे

■ पुणे, वृत्तसंस्था :

'गंगा स्वच्छतेसाठी १९८५ पासून आतापर्यंत सुमारे ३३ हजार कोटी रुपये खर्च करण्यात आले. 'नॅशनल मिशन फॉर क्लीन गंगा' या अंतर्गतही अनेक उपक्रम राबविण्यात आले. अलीकडेच वीस हजार कोटी रुपयांच्या 'नमामी' गंगे प्रकल्पाची घोषणा करण्यात आली. मात्र, अनियंत्रित बांधकामे, गंगा पात्रात सोडण्यात येणारे सांडपाणी अशा अनेक कारणांनी गंगेचे प्रदूषण दिवसेंदिवस वाढत आहे,' असे निरीक्षण ज्येष्ठ पर्यावरण अभ्यासक विजय परांजपे यांनी शनिवारी व्यक्त केले.

'आपल्याला गंगेच्या उगमाची आणि बंगालच्या उपसागराला मिळताना शेवटच्या गंगा खाडीची माहिती नसते. गंगेच्या या भागाला विसरल्यामुळे गंगेची क्षमा मागण्याची वेळ आली आहे. त्यामुळे आता 'नमामी' गंगेआधी 'क्षमामी' गंगे म्हणण्याची गरज आहे,' असेही त्यांनी स्पष्ट केले. जलसंपदा दिनानिमित्त द इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्सच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. निवृत्त एअर मार्शल भूषण गोखले, संस्थेचे राजेंद्र माहुलकर, डॉ. हर्षवर्धन देवकाते, डॉ. दत्तात्रय बोरमाने, वसंत पंदारकर, डॉ. ज्योती भुसारी आदी उपस्थित होते.

परांजपे म्हणाले, 'गंगा हे कोणत्या एका नदीचे नाव नाही. आपल्या भोवताली वाहणाऱ्या निर्मळ, अविरल नदीला गंगा म्हणले जाते. संत वाङमयातही या परंपरेचा शोध घेता येतो. आता आपण ज्या नदीला गंगा म्हणतो, तोही असाच हिमालयात उगम पावणाऱ्या अनेक नद्यांचा एक प्रवाह आहे. आता गंगा मिशनची घोषणा करण्यात आली आहे. हे गंगा मिशन म्हणजे वाराणसीला जाऊन पूजा करायची नाही, तर देशातील सगळ्या नद्या स्वच्छ करायचा, असे आहे.' 'गंगा-यमुना नदी पात्रात प्रक्रिया केलेल्या आणि सोडल्या जाणाऱ्या सांडपाण्यात सुमारे ३५ टक्क्यांची तफावत आहे. केंद्रीय जल



प्रदूषण आणि इतर संस्थांनी गंगेचा ७० टक्के मध्य भाग आंघोळीसाठी योग्य नाही, असे निरीक्षण वेगवेगळ्या अभ्यासात नोंदवले आहे. मात्र, सरकारी धोरणांमध्ये ही बाब गांभिर्याने घेतली जात नाही.

गंगा-यमुनेच्या प्रदूषणामुळे २०५० पर्यंत समुद्रपातळीत ५० सेंटीमीटरने वाढ, स्थलांतर, शेत जमिनींचे क्षारीकरण, चक्रीवादळे, अतिवृष्टी, किनारपट्टीवरील नुकसान, सुंदरबनमधील जैवविविधतेला धोका अशी अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत.

सध्या फक्त बिहार आणि मध्य प्रदेशात दोन नद्या जोडण्याचे काम सुरू आहे. नद्या जोडल्या गेल्या नाहीत, तर गंगा-यमुनेसारख्या बारामाही वाहणाऱ्या नद्याही उन्हाळ्यात कोरड्या पडतील. नद्या कोरड्या पडायला लागल्या की स्थलांतर सुरू होते. महाराष्ट्र-कर्नाटक किंवा तामिळनाडू-केरळसारखे राज्या-राज्यात पाण्यावरून वाद निर्माण होतात.' 'आता मंत्रांनीच सांगितले आहे की, पुण्यात पाण्याची मागणी वाढणार आहे. मुंबईच्या नागरी विकास प्रकल्पांपेक्षाही पुण्याला पाण्याची गरज अधिक भासते. मी लहान असताना पुण्याची लोकसंख्या साडेतीन लाख होती. आता ती ७० ते ८० लाखांवर पोहोचली. लवकरच ती दीड कोटींचा टप्पा ओलांडेल. त्यात नव्याने उभारण्यात येत असलेल्या उत्तुंग इमारतींमुळे पाण्याची गरज कितीतरी पटीने वाढेल,' असे निरीक्षण भूषण गोखले यांनी नोंदवले.

## चर्चा निष्फळ ठरल्याने जे.डी वान्स मायदेशी रवाना

■ इस्लामाबाद/वृत्तसंस्था

अमेरिकचे उपराष्ट्राध्यक्ष जे.डी. वान्स यांनी दिलेल्या माहितीनुसार, ४० दिवसांच्या युद्धानंतर झालेल्या दोन आठवड्यांच्या तात्पुरत्या युद्धबंदीला दीर्घकालीन शांततेत बदलण्यासाठी पाकिस्तानच्या इस्लामाबादमध्ये झालेली अमेरिका आणि इराणमधील चर्चा निष्फळ ठरली आहे. त्यामुळे अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी वान्स मायदेशी रवाना झाले आहेत.

होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा खुली करणे आणि अण्वस्त्र कार्यक्रम यांसारख्या मुद्द्यांवरून दोन्ही देशांमधील चर्चा अडकली. २१ तास चाललेल्या या चर्चेतून कोणताही ठोस निर्णय झाला नाही. जे.डी. वान्स यांनी सांगितले की, अमेरिकेने इराणसमोर सर्वोत्तम प्रस्ताव ठेवला होता, परंतु इराणने तो नाकारला. अमेरिकेने आपल्या 'रेड लाइन्स' (मर्यादा) स्पष्ट केल्या होत्या, पण इराणने त्या अटी मान्य केल्या नाहीत.



"आमच्या मर्यादा काय आहेत, कोणत्या गोष्टींवर आम्ही त्यांच्याशी जुळवून घेण्यास तयार आहोत आणि कोणत्या गोष्टींवर नाही, हे आम्ही अगदी स्पष्ट केले आहे. आम्ही हे शक्य तितके स्पष्ट केले आहे आणि कदाचित त्यांनी आमच्या अटी न स्वीकारण्याचा निर्णय घेतला असेल," असे व्हान्स यांनी इस्लामाबादमधील चर्चेसंदर्भात पत्रकारांना माहिती देताना सांगितले. तीन मिनिटांच्या भाषणात, अमेरिकेच्या उपराष्ट्रपतींनी सांगितले की दोन्ही राष्ट्रांच्या प्रतिनिधींमध्ये 'अनेक महत्त्वपूर्ण चर्चा' झाल्या. असे असूनही, आखाती प्रदेशात दीर्घकालीन शांतता सुनिश्चित करू शकेल अशा करारावर ते सहमत होऊ शकले नाहीत. "इराणी लोकांशी आमची अनेक महत्त्वपूर्ण चर्चा झाली आहे. ही चांगली बातमी आहे. वाईट बातमी ही आहे की आम्ही करारापर्यंत पोहोचू शकलेलो नाही आणि मला वाटते की ही अमेरिकेपेक्षा इराणसाठी अधिक वाईट बातमी आहे", असं व्हान्स म्हणाले. तेहरानने नेमके काय नाकारले याचा तपशील व्हान्स यांनी उघड केला नसला तरी, इराण नजीकच्या भविष्यात अण्वस्त्रे विकसित करणार नाही असे 'सकारात्मक वचन' अमेरिकेला मिळाले नसल्याचे त्यांनी सूचित केले.

# तरुण बनला चोर, ती स्फोटके वेगवेगळ्या कंटेनरमधली, अश्लिल चाळे करणारा जाळ्यात

■ नागपूर/वृत्तसंस्था

उपराजधानीत गुन्हेगारीच्या घटनांनी चिंताजनक वळण घेतले असून, दररोज उघडकीस येणाऱ्या प्रकारांमुळे कायद्याचा धाक उरला आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. जुगाराच्या व्यसनातून चोरीकडे वळलेला तरुण, तांदूळ व्यवहारात लाखोंची फसवणूक, शेतमाल लुटणारी आंतरराज्यीय टोळी आणि महिलांशी अश्लील चाळे करणारा विकृत अशा विविध घटनांनी शहर अस्वस्थ झाले आहे.

ऑनलाईन जुगाराच्या व्यसनामुळे कर्जाच्या खाईत लोटल्या गेलेल्या एका तरुणाने थेट चोरीचा मार्ग स्वीकारल्याची धक्कादायक घटना तहसील परिसरात उघडकीस आली. अमित रामदास उईके (३०) असे आरोपीचे नाव असून, त्याने घरात विश्रांती घेत असलेल्या ६६ वर्षीय महिलेच्या गळ्यातील दोन तोळ्यांची सोनसाखळी हिसकावली. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी त्याला अटक




केली. चौकशीत त्याने जुगारात गमावलेल्या पैशांमुळे कर्जबाजारी झाल्याने चोरी केल्याची कबुली दिली. चोरीची साखळी त्याने गहाण ठेवल्याचेही समोर आले. नागपूरातील घाऊक व्यापाऱ्याला कमी दरात तांदूळ पुरवण्याचे आमिष दाखवून चंद्रपूर जिल्ह्यातील पाच जणांनी सुमारे २० लाखांची फसवणूक केली. पियुष दिवाण या व्यापाऱ्याने करारानुसार जवळपास १९.९२ लाख रुपये अदा केले; मात्र माल न देता आरोपींनी टाळाटाळ केली. वारंवार पाठपुरावा करूनही प्रतिसाद न मिळाल्याने अखेर पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली असून, पाच जणांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. जयप्रकाश नगर ते जयताळा मार्गावर महिलांचा पाठलाग करून त्यांच्याशी अश्लील चाळे करणाऱ्या विकृताला पोलिसांनी अटक केली. कार्तिक उर्फ खोमदेव पटले (२८) असे आरोपीचे नाव असून, त्याने यापूर्वीही अनेक महिलांना त्रास दिल्याचे तपासात उघड झाले आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे त्याला रंगेहात पकडण्यात आले. शहरात वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विविध प्रकारच्या गुन्ह्यांमुळे पोलिस यंत्रणेपुढे मोठे आव्हान उभे ठाकले असून, कठोर कारवाईची गरज व्यक्त होत आहे.

**शेतमाल चोरणारी टोळी गजाआड..** शेतकऱ्यांच्या कष्टाने पिकवलेल्या धान्य व शेती अवजारांवर डल्ला मारणाऱ्या टोळीला ग्रामीण पोलिसांनी मध्यप्रदेशातील पांढुर्णा येथून अटक केली. या टोळीने महाराष्ट्रासह मध्यप्रदेशात २६ ठिकाणी चोरी करून लाखोंचा माल लंपास केला होता. स्थानिक गुन्हे शाखेच्या तपासादरम्यान या टोळीचा सुगावा लागला आणि सापळा रचून आरोपींना पकडण्यात आले.

**स्फोटक साठ्याबाबत संशय वाढला..** सेंट्रल एव्हेन्यूवरील एका ठिकाणी सापडलेल्या स्फोटक साठ्याबाबत तपासात नवे धागेदोरे समोर आले आहेत. जिलेटीन कांड्या आणि डिटोनेटर्स वेगवेगळ्या कंटेनरमधून आणले असल्याचे दिसून आले. कागदोपत्री वापर दाखवून या स्फोटकांची बेकायदेशीर विक्री झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे. ही स्फोटके कमी क्षमतेची असून, बांधकाम किंवा खनन क्षेत्रात वापरली जात असावीत, असा प्राथमिक अंदाज आहे.

## पुण्यातील निरीक्षण गृहातून १२ बांगलादेशी महिला पसार

■ पुणे/वृत्तसंस्था

बेकायदा वास्तव्य, तसेच वेश्याव्यवसाय प्रकरणात ताब्यात घेतलेल्या बांगलादेशी महिलांच्या सुरक्षेसाठी निर्माण केलेल्या हडपसर येथील एका संस्थेच्या निरीक्षण गृहातून १२ बांगलादेशी महिला पसार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. निरीक्षण गृहातील कर्मचारी (केअर टेकर) महिलेला बांधून बांगलादेशी महिला पसार झाला. २० दिवसानंतर या प्रकाराला वाचा फुटली असून, बांगलादेशी महिलांचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

हडपसर भागातील ससाणे वस्ती परिसरात एका संस्थेकडून निरीक्षण गृह चालविण्यात येते. निरीक्षण गृहात वेगवेगळ्या प्रकरणातील पीडित महिलांना न्यायालयाच्या आदेशाने पाठविण्यात येते. फरासखाना, दिघी, जेजूरी, देहूरोड, कोंढवा पोलिसांनी वेगवेगळ्या कारवाईत बांगलादेशी महिलांना ताब्यात घेतले होते. ताब्यात घेतलेल्या महिला वेश्याव्यवसायात गुंतलेल्या होत्या. त्यांना वेश्याव्यवसायास प्रवृत्त केल्या प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले होते. न्यायालयाने १८ मार्च रोजी बांगलादेशी महिलांना बांगलादेशात पाठविण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर बांगलादेशी दूतावासाशी संपर्क साधून त्यांना मायदेशी परत पाठविण्याची तयारी सुरू करण्यात आली होती. न्यायालयाने महिलांची रवानगी निरीक्षण गृहात करण्याचे आदेश दिले होते.

त्यानंतर २३ मार्च रोजी एका बांगलादेशी महिलेने पोटदुखीचा बहाणा करुन कर्मचारी महिलेला बोलाविले. त्यानंतर तिच्याबरोबर असलेल्या अन्य महिलांनी निरीक्षण गृहातील कर्मचारी महिलेचे हात पाय बांधले. निरीक्षण गृहातून त्या पसार झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. बांगलादेशी महिला पसार झाल्याची माहिती संबंधित पोलीस ठाण्यांना कळविण्यात आली. दरम्यान, निरीक्षण गृहात पोलिसांनी सुरक्षाव्यवस्था पुरवावी, अशी मागणी संबंधित संस्थेने केली होती.

## १० दुचाकी चोरणारा उल्हासनगरचा चोरटा अल्पवयीन साथीदारासह अटकेत

■ ठाणे/वृत्तसंस्था

कल्याण : कल्याण पूर्व, उल्हासनगर, विठ्ठलवाडी रेल्वे स्थानक भागात, सार्वजनिक रस्त्यावर, इमारतींच्या आवारात उभ्या केलेल्या दुचाकी पाळत ठेऊन चोरणाऱ्या उल्हासनगरमधील एक चोरटा आणि त्याचा अल्पवयीन साथीदार यांना कोळसेवाडी पोलिसांनी अटक केली आहे. त्यांनी साडे तीन लाखाहून अधिक किमतीच्या एकूण आठ दुचाकी चोरल्या आहेत.

अल्पवयीन साथीदाराची रवानगी पोलिसांनी भिवंडी येथील बाल सुधारगृहात केली आहे. कल्याण पूर्व, विठ्ठलवाडी, उल्हासनगर परिसरात दुचाकी चोरीचे प्रमाण काही दिवसांपासून वाढले होते. या वाहन चोरीच्या घटनांची वाहन मालकांकडून पोलीस ठाण्यात तक्रार केली जात होती. त्यामुळे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी या वाहन चोरीच्या घटनांची विशेष पथके स्थापन करून चौकशी करण्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे कोळसेवाडी पोलीस वाहन चोरीच्या घटनांचा स्वतंत्रपणे तपास करत होते.

विठ्ठलवाडी रेल्वे स्थानक भागात रॉयल रेसिडेन्सी भागात रस्त्यालगत उभ्या केलेल्या दुचाकींची पाहणी दोन इसम करत आहेत अशी गोपनीय माहिती कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे हवालदार सुरेंद्र इंगळे यांना मिळाली. हवालदाराने ही माहिती कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हेमंत गुरव, पोलीस निरीक्षक गणेश न्हायदे यांना दिली.




या माहितीप्रमाणे कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे दुचाकी चोरीचे तपासणी पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यावेळी त्यांना दोन इसम दुचाकींजवळ उभे असल्याचे दिसले. पोलिसांनी त्यांना पळून जाणार नाहीत अशा पध्दतीने चारही बाजुने घेराव घालून रोखून धरले.

पोलिसांनी दुचाकीजवळ उभ्या असलेल्या शुभम उर्फ शिवम संपत पठारे (२४), त्याचा अल्पवयीन सहकारी यांना ताब्यात घेतले. शुभमहा उल्हासनगर तीन येथील पंजाबी कॉलनीमध्ये असलेल्या गुरुद्वाराजवळच्या एका चाळीत राहतो. त्याचा अल्पवयीन साथीदार उल्हासनगरमध्ये शुभमच्या घराच्या परिसरात राहतो. या मुलाची रवानगी भिवंडीच्या बालसुधारगृहात करण्यात आली आहे. शुभमला पोलिसांनी अटक केली आहे.

## पीएचडी मार्गदर्शकाच्या त्रासाला कंटाळून तरुणीची आत्महत्या

■ पिंपरी, वृत्तसंस्था :

वनस्पतीशास्त्रात पीएचडी करणाऱ्या तरुणीने 'पीएचडी'साठी मार्गदर्शन करणाऱ्या मार्गदर्शकाकडून (गाईड) होणाऱ्या छळाला कंटाळून आत्महत्या केल्याची घटना चिंचवड येथे शनिवारी घडली. पीएचडी मार्गदर्शकाला अटक करण्यात आली असून, पोलीस या घटनेचा तपास करीत आहेत.

आत्महत्या करणाऱ्या ३० वर्षीय विद्यार्थिनीच्या वडिलांनी भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार, पीएचडी मार्गदर्शकाला अटक करण्यात आली आहे. या बाबत पोलीस निरीक्षक (गुन्हे)



भोजराज मिसाळ यांनी माहिती दिली.

पोलिसांनी सांगितले, की मृत तरुणीने 'बॉटनी' या विषयात एमएससी केले होते. ती पीएचडी करीत होती. आरोपी तिचा मार्गदर्शक होता. ऑगस्ट २०२५ पासून मार्गदर्शक तिला अनैतिक मार्गानी, गैरवर्तन आणि मानसिक त्रास देत होता. शनिवारी सकाळी तरुणीचे कुटुंबीय बाहेर गेले होते. ती खोलीमध्ये असताना उशिरापर्यंत दरवाजा न उघडल्याने कुटुंबीयांनी पोलिसांना बोलविले. दरवाजा उघडल्यानंतर तरुणी गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळली. तिला रुग्णालयात दाखल केले. मात्र, तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

आत्महत्या करण्यापूर्वी तरुणीने चिठ्ठी लिहून ठेवली होती. त्यामध्ये पीएचडी मार्गदर्शकाच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या करीत असल्याचे तिने नमूद केल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलिसांनी सांगितले, की 'पीएचडी मार्गदर्शकाने तीन दिवसांपूर्वी स्टॅम्प पेपरवर पुन्हा अशी चूक करणार नाही, असे लिहून दिले होते. परंतु, तरुणी या मानसिक धक्क्यातून सावरली नाही. त्यामुळे चिठ्ठी लिहून तिने राहत्या घरी गळफास घेतला.' पोलिसांनी आरोपी पीएचडी मार्गदर्शकाला अटक केली असून, पिंपरी न्यायालयाने आरोपीला १५ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

विवेक ऊर्फ विकी विनोद सोनकांबळे (१९, अण्णाभाऊ साठे नगर, निगडी), जुबेर नासीर शेख (३०) या दोघांना पोलिसांनी अटक केली आहे. प्रसाद नंदकुमार बहुले (३०, अण्णाभाऊ साठे नगर, निगडी) असे जखमी तरुणाचे नाव आहे. त्यांनी निगडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी प्रसाद आणि आरोपी यांच्यात वाद झाला होता. याचाच राग मनात धरून आरोपींनी संगणमत केले. पहाटेच्या वेळी आरोपींनी प्रसादला गाठून "तुला जिवंत सोडत नाही" असे म्हणत जिवे मारण्याच्या उद्देशाने डोक्यात कोयता मारून गंभीर जखमी केले. यावेळी मध्यस्थी करण्यासाठी आलेल्या एकाच्या हातावरही आरोपी जुबेरने कोयत्याने वार केला. उर्वरित दोन आरोपींनी शौचालयाच्या तुटलेल्या पट्टीने आणि लाकडी दांडक्याने मारहाण केली. त्यानंतर आरोपींनी परिसरात हत्यारे फिरवून "आम्ही येथील भाई आहोत" अशी ओरडाओरड करत दहशत निर्माण केली. निगडी पोलीस तपास करत आहेत.

# आरसीबीने मुंबईला घरच्या मैदानावर पाजलं पराभवाचं पाणी; MIची पराभवांची हॅटट्रिक



■ मुंबई, वृत्तसंस्था :

आरसीबी संघाने सलग दुसऱ्यांदा मुंबई इंडियन्सचा घरच्या मैदानावर पराभव केला आहे. आरसीबीने मुंबईचा १८ धावांनी पराभव केल्याने हार्दिक पंड्याच्या नेतृत्वाखालील या संघाने पराभवाची हॅटट्रिक लगावली आहे. आरसीबीने सांघिक कामगिरीच्या बळावर हा शानदार विजय नोंदवला आहे. तर पुन्हा एकदा गोलंदाजीत मुंबईचा संघ कमी पडला.

आरसीबीने प्रथम फलंदाजी करताना टॉप-५ फलंदाजांच्या बळावर २० षटकांत ४ बाद २४० धावा केल्या. तर प्रत्युत्तरात मुंबईचा संघ २० षटकांत ५ बाद २ धावा केल्या आहेत. रोहित शर्मा रिटायर्ड हर्ट होत मैदानाबाहेर गेल्याचा फटका मुंबई इंडियन्सला चांगलाच धक्का बसला आहे.

आरसीबीने दिलेल्या २४१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना रोहित शर्मा व रायन रिकल्टन यांनी संघाला चांगली सुरूवात करून दिली आहे. रिकल्टन-रोहितने मुंबईला पॉवरप्लेमद्ये ६० धावांच्या जवळ नेलं. पण रोहित शर्मा सहाव्या षटकात हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे रिटायर्ड हर्ट होत मैदानाबाहेर परतला. याचा मुंबईला चांगलाच फटका बसला. यानंतर रिकल्टन व तिलक वर्मा एकाच षटकात बाद झाल्याने मुंबईच्या धावांना ब्रेक लागला. रिकल्टन ३७ धावा तर तिलक १ धाव करत बाद झाला. त्यानंतर सूर्यकुमार यादव व हार्दिक पंड्या यांनी संघाचा डाव सावरला. पण दोघेही ठराविक अंतराने विकेट्स गमावत बाद झाले. सूर्या ३३ धावा करत तर हार्दिक ४० धावा करत बाद झाले. पण शेरफन रूदरफोर्डने अखेरच्या षटकात कमालीची खेळी केली. रूदरफोर्डने ३१ चेंडूत ९ षटकार व एका चौकाराच्या मदतीने ७१ धावांची उत्कृष्ट खेळी केली. त्याच्या या वादळी खेळीच्या बळावर मुंबई इंडियन्सने फक्त १८ धावांच्या फरकाने सामना गमावला. मुंबई इंडियन्सने नाणेफेक जिंकत आरसीबीला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं आणि आरसीबीच्या सलामी जोडीने वादळी खेळी केल्या. फिल सॉल्ट व विराट कोहलीच्या जोडीने ६५ चेंडूत १२० धावांची भागीदारी रचली. फिल सॉल्ट ३६ चेंडूत ६ चौकार व ६ षटकारांसह ७८ धावा करत बाद झाला. त्यानंतर विराट कोहली ३८ चेंडूत ५ चौकार व एका षटकारासह ५० धावा करत माघारी परतला. तर रजत पाटीदारचं वानखेडेच्या मैदानावर जणू वादळ आलं होतं. पाटीदारने २० चेंडूत ४ चौकार व ५ षटकारांसह ५३ धावांची वादळी खेळी केली. तर टीम डेव्हिडने १६ चेंडूत २ चौकार व ३ षटकारांसह ३४ धावांची झटपट खेळी केली.

## पाचवं क्रिकेट स्टेडियम पण बॅडमिंटनपटू चिराग शेट्टीला हक्काचं स्टेडियम कधी मिळणार?

■ मुंबई/वृत्तसंस्था

बॅडमिंटनपटू चिराग शेट्टीला क्रिकेट मनापासून आवडतं. क्रिकेट पाहायला आणि बोलायला दोन्ही आवडतं. तो क्रिकेट खेळतोही. यादृष्टीने तो पक्का मुंबईकर आहे. बाकी खेळातले बहुतांश खेळाडू क्रिकेट पाहतात. त्यांना ते आवडतं. भारतीय क्रिकेट संघ जिंकतो तेव्हा त्यांना प्रचंड आनंद होतो. ते मित्रमंडळींच्या बरोबरीने हा आनंद साजराही करतात. आयपीएल संघालाही फॉलो करतात. मुंबई एक जागतिक दर्जाचं शहर आहे पण हे शहर आंतरराष्ट्रीय क्रमवारीत अव्वल स्थानी भरारी घेतलेल्या बॅडमिंटनपटू चिराग शेट्टीचा आदरसन्मान करतं का? चिराग जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी होता. जागतिक अजिंक्यपद स्पर्धेचा दोनदा विजेता आहे. आशियाई तसंच आशियाई अजिंक्यपद स्पर्धा जिंकला आहे. थॉमस चषक म्हणजे बॅडमिंटनविश्वाचा वर्ल्डकप असलेल्या स्पर्धेतील विजेत्या भारतीय संघाचा भाग होता. मुंबईकरांना अभिमान वाटेल अशीच देदिप्यमान कामगिरी चिरागने केली आहे मात्र या शहरात आंतरराष्ट्रीय दर्जाचं स्टेडियम नाही, मोठी स्पर्धा होऊ शकेल असं ठिकाणही नाही हे शल्य आहे.




मुंबईत आता एक लाखापेक्षा क्षमतेचं क्रिकेट स्टेडियम उभं राहणार आहे. ठाणे जिल्ह्यात हे स्टेडियम होणार अशी चर्चा होती मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार आता हे स्टेडियम नवी मुंबई परिसरात होणार आहे. या भव्य स्टेडियमसाठी जागेचा शोध पूर्ण झाल्याचं वृत्त आहे. मुंबई आणि परिसरातलं हे पाचवं मोठं स्टेडियम असेल. दक्षिण मुंबईत वानखेडे आणि ब्रेबॉर्न स्टेडियम, वांद्रे कुर्ला संकुलात शरद पवार जिमखाना क्रिकेट स्टेडियम, नवी मुंबईतलं डीवाय पाटील स्टेडियम यांच्या बरोबरीने आता एक मोठं स्टेडियम उभं राहणार आहे. मात्र एवढी स्टेडियम्स असूनही आयसीसीच्या स्पर्धांच्या फायनल्स अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवल्या जातात. आतापर्यंत वानखेडे स्टेडियमवर फायनल्स होत असत. याच मैदानात महेंद्रसिंग धोनीने षटकार लगावला आणि भारतीय संघाने २०११ वर्ल्डकपच्या जेतेपदावर शिक्कामोर्तब केलं होतं. मात्र वानखेडे स्टेडियमची क्षमता मर्यादित आहे असं सांगून सामने अन्यत्र खेळवण्यात येत आहेत. सगळ्यात मोठं स्टेडियम कुठलं या शर्यतीत मुंबई मागे पडलं आहे.

## कोहलीने घडवला इतिहास, मुंबई इंडियन्सविरूद्ध अशी कामगिरी करणारा पहिलाच खेळाडू

■ निंगबो (चीन)/वृत्तसंस्था

वानखेडेच्या मैदानावर मुंबई इंडियन्स आणि आरसीबी यांच्यात अटीतटीचा सामना खेळवला जात आहे. या सामन्यात आरसीबीने प्रथम फलंदाजी करताना वादळी फटकेबाजी केली आहे. मुंबई इंडियन्सच्या फलंदाजांची धुलाई करत १७व्या षटकात आरसीबीने २०० धावांचा पल्ला गाठला. या सामन्यात विराट व फिल सॉल्ट यांनी संघाला चांगली सुरूवात करून दिली. तर किंग कोहलीने मुंबई इंडियन्सविरूद्ध मोठ्या ऐतिहासिक विक्रमाची नोंद केली आहे.

विराट कोहली व फिल सॉल्टने मुंबईविरूद्ध फलंदाजीला दणक्यात सुरूवात करून दिली. फिल सॉल्ट व विराट कोहली यांनी पहिल्या विकेटसाठी ६५ चेंडूत १२० धावांची भागीदारी रचली. फिल सॉल्टने वादळी फटकेबाजी करत ३६ चेंडूत ७८ धावा केल्या. तर विराट कोहलीने मैदानावर एका टोकाकडून सावधपणे आपली खेळी साकारली आहे. विराटने ३८ चेंडूत ५ चौकार व एका षटकारासह ५० धावा केल्या आहेत. या खेळीदरम्यान विराटने मोठा विक्रम आपल्या नावे केला.



विराट कोहलीने या सामन्यात खेळीदरम्यान विराटने मुंबई इंडियन्सविरुद्ध १ हजार धावा पूर्ण केल्या. मुंबई इंडियन्सविरुद्ध १ हजार धावा करणारा तो पहिला खेळाडू ठरला. त्याने आयपीएल आणि चॅम्पियन्स लीग (CLT20) या दोन्ही स्पर्धांमध्ये मिळून मुंबई इंडियन्सविरुद्ध या धावा केल्या. या सामन्यात विराटने शानदार फलंदाजी केली आणि फिल सॉल्टसोबत मिळून संघाला एक भक्कम सुरुवात करून दिली. टी-२० फॉरमॅटमध्ये मुंबई इंडियन्सविरुद्ध सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये विराट कोहली अव्वल स्थानी आहे. दुसऱ्या क्रमांकावर केएल राहुलचं नाव आहे. केएल राहुलने मुंबईविरुद्ध २१ सामन्यांमध्ये ९७७ धावा केल्या आहेत. या यादीत शिखर धवन तिसऱ्या क्रमांकावर आहे.

# गुजरातचा लखनौवर सहज विजय, पंतच्या संघाने गुडघे टेकले



■ गुवाहाटी/वृत्तसंस्था

गुजरात टायटन्सने ऋषभ पंतच्या लखनौ सुपर जायंट्स संघाचा त्यांच्याच घरच्या मैदानावर ७ विकेट्सने सहज पराभव केला आहे. गुजरातकडून शुबमन गिल, जोस बटलर आणि प्रसिध कृष्णा यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. तर गुजरातच्या पद्धतशीर गोलंदाजी माऱ्यापुढे लखनौचा संघ २० षटकांत फक्त १६४ धावा करण्यात यशस्वी ठरला.

गुजरातने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला आणि लखनौ संघाला मोठी धावसंख्या उभारू दिली नाही. लखनौ संघाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ९ बाद १६४ धावा केल्या. तर गुजरातने जोस बटलर आणि शुबमन गिलच्या खेळीच्या बळावर १८.४ षटकांत सहज विजय मिळवला.

प्रत्युत्तरादाखल खेळताना साई सुदर्शन १५ धावांवर बाद झाला. मात्र त्यानंतर शुबमन गिल आणि जोस बटलर यांनी दुसऱ्या विकेटसाठी ८४ धावांची भागीदारी करत विजयाचा पाया रचला. जोस बटलरने ६० तर शुबमन गिलने ५६ धावांची खेळी केली. वॉशिंग्टन सुंदरने १३ चेंडूत २१ धावांची खेळी करत गुजरातच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं.

गुजरातने टॉस जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. गुजरातच्या गोलंदाजांनी अचूक टप्प्यावर गोलंदाजी करत लखनौच्या धडाकेबाज फलंदाजांना रोखलं. लखनौच्या एकाही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. एडन मारक्रम आणि मिचेल मार्श या अनुभवी जोडीकडून लखनौला मोठ्या अपेक्षा होत्या. मात्र ते अपेक्षित सुरुवात देऊ शकले नाहीत. कर्णधार ऋषभ पंत १८ धावा करून तंबूत परतला. आयुष बदोनी स्थिरावतोय वाटत असतानाच बाद झाला. मागच्या सामन्याचा नायक मुकुल चौधरी १८ धावा करून तंबूत परतला. निकोलस पूरनही झटपट तंबूत परतला. अब्दुल समदही अपयशी ठरला. गुजरातच्या गोलंदाजांनी उसळत्या चेंडूचा मारा करत लखनौच्या फलंदाजांना निष्प्रभ केलं. प्रसिध कृष्णाने ४ विकेट्स घेत लखनौच्या डावाला खिंडार पाडलं.

# ओटीटीवरील डोकं चक्रावणारा चित्रपट, प्रत्येक सीनमध्ये भयंकर ट्विस्ट, सत्य-असत्याचा हा खेळ पाहून हैराण व्हाल

मल्याळम चित्रपटसृष्टीने पुन्हा एकदा एका जबरदस्त सायकोलॉजिकल थ्रिलरसह आपली छाप पाडली आहे. २०२४ मध्ये एक असा मल्याळम सायकोलॉजिकल थ्रिलर चित्रपट आला होता, ज्याने प्रेक्षकांना थक्क केलं. सस्पेन्सने भरलेल्या या चित्रपटात प्रत्येक क्षणी एक नवीन ट्विस्ट येतो. दोन पात्रांभोवती फिरणारी ही कथा आणि त्यांच्यात घडणाऱ्या घटना या चित्रपटाला अधिक रंजक बनवतात.



या चित्रपटाचे नाव 'लेव्हल क्रॉस' (Level Cross) आहे. हा एक मल्याळम सायकोलॉजिकल थ्रिलर चित्रपट असून यात आसिफ अली आणि अमाला पॉल मुख्य भूमिकेत आहेत. जर तुम्हाला या विकेंडला काहीतरी वेगळं आणि डोकं चक्रावून टाकणारं पाहायचं असेल, तर 'लेव्हल क्रॉस' हा एक उत्तम पर्याय आहे. सस्पेन्स, सायकोलॉजी आणि सतत येणाऱ्या ट्विस्टमुळे हा चित्रपट प्रेक्षकांना सुरुवातीपासून शेवटपर्यंत खिळवून ठेवतो.

२०२४ मध्ये प्रदर्शित झालेला 'लेव्हल क्रॉस' हा चित्रपट म्हणजे सस्पेन्स आणि उत्कंठेचा एक उत्तम संगम आहे. दिग्दर्शक अरफाझ अयुब यांनी एका निर्जन रेल्वे क्रॉसिंगच्या पार्श्वभूमीवर मानवी मन, भीती आणि रहस्याचे जे जाळे विणले आहे, ते प्रेक्षकांना शेवटपर्यंत जागेवरून उठू देत नाही. आसिफ अली आणि अमाला पॉल यांनी साकारलेली पात्रे आणि त्यांच्यातील संघर्ष इतका प्रभावी आहे की, पडद्यावर जे दिसतंय ते खरं की भास, हे ओळखणे कठीण होते. प्राइम व्हिडिओवर उपलब्ध असलेला हा चित्रपट सस्पेन्स प्रेमींसाठी एक पर्वणीच आहे.

**लेव्हल क्रॉसची कथा**

या चित्रपटाची खास गोष्ट म्हणजे, यात जे दिसतं ते पूर्णपणं खरं नसतं. चित्रपटाची कथा प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडते. यातलं नेमकं खरं काय आहे आणि खोटं काय ते कळतच नाही. कथेची सुरुवात एका निर्जन रेल्वे क्रॉसिंगपासून होते, जिथे एक चौकीदार (आसिफ अली) एकटाच राहत असतो. तो दिसायला खूप विचित्र आहे आणि त्याचे राहणीमानही इतरांपेक्षा पूर्णपणे वेगळे आहे. तो अनेकदा तिथून जाणाऱ्या ट्रेनकडे पाहत राहतो आणि पुन्हा आपल्या घरी परततो. त्याचे आयुष्य अत्यंत रहस्यमयी आहे.

एक महिला (अमला पॉल) चालत्या ट्रेनमधून उडी मारते आणि तो चौकीदार तिला जखमी अवस्थेत आपल्या घरी घेऊन येतो. शुद्धीवर आल्यावर ती महिला स्वतःबद्दल काही गोष्टी सांगते, पण तिच्या वागण्यावरून असं स्पष्ट जाणवतं की ती काहीतरी लपवत आहे. सर्वात रंजक गोष्ट म्हणजे, ती त्या चौकीदारालाही घाबरताना दिसते. इथूनच कथेतील सस्पेन्स अधिक वाढत जातो. चित्रपटाची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे यात जे काही दाखवलं जातं, ते पूर्णपणे खरं नसतं. कथा प्रेक्षकांना वारंवार संभ्रमात टाकते आणि प्रत्येक वळणावर एक नवीन ट्विस्ट घेऊन येते.

याच कारणामुळे शेवटपर्यंत प्रेक्षक जे बघतोय त्यातलं काय खरं आहे, याचा अंदाज लावू शकत नाहीत. दिग्दर्शक अरफाझ अयुब यांनी मानवी मन, भीती आणि मानसिक स्थिती या गोष्टी चित्रपटात अतिशय रंजक पद्धतीने मांडल्या आहेत. त्यांनी दोन्ही पात्रांमधील केमिस्ट्री आणि त्यांच्यातील संघर्ष खूप चांगल्या प्रकारे दाखवला आहे. विशेष म्हणजे, मोजकी पात्रे आणि मर्यादित लोकेशन असूनही चित्रपट कुठेही कंटाळवाणा वाटत नाही.

## "...म्हणून रोहित शेट्टी यांच्या सिनेमाला नकार दिला"

एखाद्या कलाकारासाठी समोरून ऑफर होणाऱ्या भूमिकेला नकार देणं हे साहजिकच कठीण असतं. मनोरंजन विश्व हे अनिश्चित स्वरूपाचं आहे. त्यात समोरून एखादं काम चालून येत असेल, तर त्या भूमिकेला नाही म्हणणं अनेकदा कलाकारासाठी कठीण जातं. पण असे अनेक कलाकार आहेत, जे हा निर्णय अगदी सहजपणे घेतात. असाच निर्णय मराठी अभिनेते अजय पुरकर यांनी घेतला होता.

अजय पुरकर यांनी आजवर अनेक मराठी नाटक, मालिका व चित्रपटांमधून प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. त्यांच्या सकारात्मक अन् नकारात्मक अशा प्रत्येक भूमिकेला प्रेक्षकांनी पसंती दिली आहे. मराठी कलाविश्वात आपल्या अभिनयाची छाप पाडणाऱ्या अजय पुरकर यांना हिंदीतूनही ऑफर आल्या होत्या; पण त्यांनी त्या नाकारल्या.

बॉलीवूडचा प्रसिद्ध दिग्दर्शक रोहित शेट्टी यांनी त्यांच्या सिनेमासाठी अजय पुरकर यांना विचारलं होतं; पण अजय यांनी तेव्हा त्या भूमिकेला नकार दिला होता. त्याबद्दल स्वत: अजय पुरकर यांनीच एका मुलाखतीत खुलासा केला होता. मुलाखतीत अजय पुरकर म्हणाले होते, " 'असंभव'सारखी मालिका मी २००७, २००८ व २००९ अशी तीन वर्षे केली. त्यासाठी मला पुरस्कारदेखील मिळाले. नंतर मला लक्षात आलं की, एखादी भूमिका जरा चांगली केली, तर त्याचा त्रासही होतो. कारण- त्यानंतर मला अनेक इन्स्पेक्टरच्या भूमिका ऑफर व्हायला लागल्या. 'असंभव'मधील भूमिकेनंतर मला इन्स्पेक्टरच्या भूमिकेबद्दल विचारणा झाली आणि त्यानंतर मी त्यांना नकार दिला. देवानं मला ती ताकद दिली आहे की, मी भूमिकेसाठी नाही म्हणू शकतो. 'असंभव' या मालिकेनं मला एक ओळख दिली. त्याआधी दोन-चार मालिका केल्या होत्या; पण त्यात दोनेक एपिसोडपुरतं काम होतं.

## "अनेक वर्षे उंचीबद्दल न्यूनगंड होता", पूजा सावंतने व्यक्त केली मनातली खंत, म्हणाली, "शाळेत हिणवलं जायचं..."

'मन धागा धागा जोडते नवा' म्हणत मराठीसह हिंदी प्रेक्षकांवर आपल्या अभिनयाची व सौंदर्याची मोहिनी घालणारी 'कलरफुल' अभिनेत्री म्हणजे पूजा सावंत. आपल्या अभिनयाने व हटके स्टाईल अंदाजमुळे चर्चेत राहणारी पूजा सोशल मीडियावरही तितकीच सक्रिय असते.



पूजा सोशल मीडियावर तिचे अनेक स्टायलिश फोटो अन् व्हिडीओ शेअर करत असते. त्याचबरोबर पूजा सोशल मीडियाद्वारे तिच्या आगामी कामासह खासगी आयुष्यातील काही रंजक माहितीदेखील शेअर करत असते. पूजाची कलरफूल म्हणूनही एक वेगळी ओळख आहे. प्रेक्षकांनीच तिला कलरफूल हे नाव दिलं आहे. 'दगडी चाळ'मधील भूमिकेनंतर तिला हे नवीन नाव मिळालं.

अभिनय, नृत्यकौशल्य अन् सौंदर्याद्वारे पूजानं प्रेक्षकांच्या मनात आपलं एक स्थान निर्माण केलं असलं तरी एका गोष्टीचा तिला लहानपणी न्यूनगंड होता आणि तो म्हणजे तिच्या उंचीचा. पूजानं स्वत:च याबद्दल एका मुलाखतीत खुलासा केला. अभिनेत्री सध्या तिच्या आगामी 'सालबर्डी' सिनेमामुळे चर्चेत आहे. त्याच सिनेमाच्या प्रमोशननिमित्ताने तिनं एका मुलाखतीत उंचीचा न्यूनगंड असल्याचं सांगितलं.

मराठी "मनोरंजन विश्व'ला दिलेल्या मुलाखतीत पूजा म्हणाली, "मला प्रेक्षकांनी घडवलं आहे. प्रेक्षकांनीच मला कलरफूल हे नाव दिलं आहे. प्रेक्षकांना माझं काम आवडलं. म्हणूनच मला पुढचे प्रोजेक्ट्स मिळाले. ते प्रोजेक्ट्स चालले. कारण- पुन्हा प्रेक्षकांनीच त्या प्रत्येक प्रोजेक्ट्सवर प्रेम केलं. त्यांना माझं त्या त्या प्रोजेक्टमधलं काम आवडलं. एक मध्यमवर्गीय मुलगी, जिचा अभिनेत्री होण्याचा कधीच विचार नव्हता; पण नशिबाच्या एका वळणावर ती मुलगी अभिनेत्री झाली. त्यानंतर मी अभिनेत्री म्हणून घडत गेले. प्रेक्षकांच्या प्रेमामुळेच ते शक्य झालं आहे. मला कळायला लागलं की, आपण प्रेक्षकांना आवडत आहोत."

पुढे ती म्हणाली, "मला अनेक वर्षं माझ्या उंचीबद्दल न्यूनगंड होता. मला शाळेत उंचीवरून हिणवलं जायचं. कॉलेजमध्येसुद्धा माझ्या उंचीवर विनोद केले जायचे. पण, या क्षेत्रात आल्यानंतर प्रेक्षकांकडून 'अरे, काय उंच अभिनेत्री आहे' अशी एक प्रतिक्रिया आली, तेव्हा मला कळलं की, उंची हा माझा न्यूनगंड नसून एक गुण आहे. प्रेक्षकांमुळेच मला माझ्या उंचीचा असलेला न्यूनगंड गेला. त्यामुळेच मी म्हणते की, मला प्रेक्षकांनी घडवलं आहे. त्यांनीच मला कलरफूल हे नाव दिलं आहे. पूजा या नावापेक्षा मी कलरफूल म्हणून अधिक लोकप्रिय आहे."

## मूल झाले नाही म्हणून प्रेमविवाह मोडला, चुलत बहिणीशी तिसरे लग्न..

अभिनेते अजित हे त्यांच्या खलनायकाच्या भूमिकेसाठी ओळखले जातात. १९७६ ला प्रदर्शित झालेल्या कालीचरण या चित्रपटातील त्यांची भूमिका चांगलीच गाजली. त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील गोष्टींचीदेखील चांगलीच चर्चा झाली.

अजित यांनी तीन लग्ने केली. त्यांनी तिसरे लग्न केले तरीही दुसऱ्या पत्नी आणि मुलांबरोबरचे त्यांचे संबंध कायम चांगले होते. दुसरी पत्नी त्यांची चुलतबहीणही होती.

तिसरी पत्नी सारा व अजित यांचा मुलगा शेहजाद खानने त्याच्या कुटुंबाबद्दल एका मुलाखतीत वक्तव्य केले आहे. तो म्हणाला, "माझे वडील अजित यांचा प्रेमविवाह झाला होता. अँग्लो-इंडियन ग्वेन यांच्याशी त्यांनी लग्न केलं होतं; मात्र त्यांना मूल होऊ शकलं नाही. त्यामुळे त्यांचं नातं टिकू शकलं नाही. कारण- पठाण वंश पुढे कसा चालणार? त्या काळात ही खूप मोठी गोष्ट होती. म्हणून आजोबांनी त्यांचं लग्न त्यांच्या चुलतबहिणीशी शाहिदा यांच्याशी करून दिलं. त्यांना तीन मुलं झाली."

अजित यांचे तिसरे लग्न सारा यांच्याशी झाले. हा प्रेमविवाह होता. मात्र, सारा यांच्याशी लग्न करताना अजित यांनी त्यांचे आधीच लग्न झाले आहे, असे सारा यांना सांगितले नाही. शेहजाद खुलासा करताना म्हणाला, "माझ्या वडिलांचं दुसरं लग्न कायम टिकून राहिलं. त्यांनी माझ्या आईला कधीच सांगितलं नाही की, त्यांचं आधीच लग्न झालेलं आहे. त्यांच्या दुसऱ्या पत्नीला व त्यांच्या मुलांना हैदराबादमध्ये लपवून ठेवलं होतं. माझी आई माझ्या वडिलांपेक्षा २५ वर्षांनी लहान होती. जर वडिलांचं आधीच लग्न झालं आहे, हे तिला माहीत असतं, तर तिनं त्यांच्याशी कधीच लग्न केलं नसतं. माझ्या जन्मानंतरच तिला वडिलांच्या आधीच्या लग्नाबद्दल माहीत झालं."





जरी अजित यांनी सारा यांना शाहिदा यांच्याबद्दल सांगितले नव्हते. तरी त्यांनी सारा यांची ओळख ग्वेन यांच्याशी करून दिली होती. घटस्फोट झाल्यानंतर ग्वेन लंडनमध्ये स्थायिक झाल्या होत्या. त्यानंतरही त्यांच्यात मैत्री कायम होती. पुढे जेव्हा सारा यांच्या अजित व शाहिदा यांच्या लग्नाबद्दल समजले, तेव्हा त्यांनी घटस्फोट घेतला नाही किंवा त्या अजित यांच्यापासून वेगळ्या झाल्या नाहीत.

शेहजाद खान म्हणाला, "माझ्या आईनं तडजोड केली. त्या काळात जवळजवळ प्रत्येक स्त्री तडजोड करीत असे. अर्थात, मला त्याचा खूप त्रास झाला. माझ्यासाठीही तो मोठा धक्का होता." तो पुढे असेही म्हणाला, "वडिलांनी आमच्या बाबतीत अन्याय केला. त्यांनी हैदराबादमध्ये खूप मालमत्ता घेतली होती; पण आमच्यासाठी त्यांनी काहीच घेतलं नाही. माझ्या सावत्र भावांनी सगळी मालमत्ता ताब्यात घेतली. ते जितके त्यांचे वडील होते, तितकेच आमचेही होते. मालमत्ता वाटली पाहिजे होती; पण देवाची न्याय देण्याची स्वतःची पद्धत असते. त्यांच्यापैकी एकाला किडनीचा त्रास आहे; तर दुसऱ्याला वेगळाच आजार आहे." "भाड्याच्या उत्पन्नावर ते किती दिवस राहू शकणार आहेत? मी माझ्या सावत्र भावांबरोबर संपर्कात नाही. ते सगळे हैदराबादमध्ये आहेत. माझ्या माहितीनुसार- वडिलांची दुसरी पत्नी अजूनही जिवंत आहे. माझ्या वडिलांनी चुका केल्या. एकदा, दोनदा नाही, मी तर म्हणेन त्यांनी तीन वेळा चुका केल्या; पण तरीही ते आमचे वडीलच होते", असे म्हणत शेहजाद खानने त्याच्या भावना व्यक्त केल्या.

# गो. से. महाविद्यालयामध्ये पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळा उत्साहात संपन्न

**जनसंचलन/ बुलढाणा**

स्थानिक विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळाद्वारे संचालित गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगांव येथे दि. १३ एप्रिल २०२६ रोजी संत गाडगे बाबा, अमरावती विद्यापीठ २०२४-२५ मधील गुणवंत प्राप्त विद्यार्थ्यांचा पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळा मोठ्या उत्साहात व आनंददायी वातावरणात संपन्न झाला. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून श्री. राहुल नरवाडे (सहाय्यक कुलसचिव) संत गाडगे बाबा, अमरावती विद्यापीठ, अमरावती व डॉ. ई. यु. माने (...., .), माजी विद्यार्थी हे उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. डॉ. सुभाषजी बोबडे हे होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर, विद्यार्थी विकास समितीचे समन्वयक डॉ. जे. डी. पोरे, विज्ञान विभाग प्रमुख डॉ. ए. व्ही. पाडघन, कला विभाग प्रमुख डॉ. आर. आर. गव्हाळे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. डी. एन. व्यास, विद्यार्थी प्रतिनिधी कु. श्रुती आटोळे, सचिव कु. सई मोहीते यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर वंदे मातरम व विद्यापीठ गीत सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व दीक्षांत उपदेश प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर सर यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व सांगितले की, पदवी प्राप्त करणे हा आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असून विद्यार्थ्यांनी यानंतरही ज्ञानार्जनाची प्रक्रिया सुरू ठेवावी. तसेच त्यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीबाबतही माहिती दिली. या प्रसंगी दीक्षांत भाषणात श्री. राहुल नरवाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ङ्घपदवी हा शेवट नसून नव्या प्रवासाची सुरुवात आहे. विद्यार्थ्यांनी सातत्य, प्रामाणिकपणा व कष्ट यांच्या जोरावर आपले करिअर घडवावे.फ्फ त्यांनी पुढे असेही नमूद केले की, ङ्घआजच्या स्पर्धात्मक युगात कौशल्याधारित शिक्षण अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी नवीन तंत्रज्ञान व कौशल्य आत्मसात करावे.फ्फ माजी विद्यार्थी डॉ. ई. यु. माने यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ङ्घया महाविद्यालयाने मला घडवले असून येथे मिळालेली मूल्ये आयुष्यभर उपयोगी पडतात.फ्फ त्यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य, शिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचा सल्ला दिला. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार हा होता. यामध्ये कु. सफिया बेगम सरफराज बेग- बी.ए. तृतीय वर्ष, विशाल सतिशराव जाधव - बी.कॉम. तृतीय वर्ष, सोनल श्रीकांत ठाकरे - बी.एस्सी. तृतीय वर्ष, वैभव प्रल्हाद निमकडे - बी.सी.ए. तृतीय वर्ष, स्नेहल सुरेश घोगरे - एम.ए. अंतिम वर्ष (मराठी), रुपाली परमेश्वर पारसकर - एम.ए. अंतिम वर्ष (अर्थशास्त्र), संतोष सांरगधर वरणकार - एम.ए. अंतिम वर्ष (इंग्रजी), भाग्यश्री रमेश कडाले - एम.ए. अंतिम वर्ष (हिंदी), श्रावणी विनोद घोगले - एम.ए. अंतिम वर्ष (इतिहास), सुजाता किसन धुराचे - एम.कॉम. अंतिम वर्ष, संजना सुरेश सिसोदीया - एम.कॉम. अंतिम वर्ष, रुकया सलाहाना मोहम्मद रफीक - एम.एस्सी. (वनस्पतिशास्त्र), साक्षी किशोर शिंदे - एम.एस्सी. (रसायनशास्त्र), परमजीत कौर हरिश्चंद्र सिंग सैनी - एम.एस्सी. (संगणक विज्ञान), किरण गोपाल टिकार - एम.एस्सी. (प्राणिशास्त्र), वैशाली गजानन ढगे - डी.टॅक्स (डिप्लोमा इन टॅक्सेशन), यांना पदवी प्रदान करून पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# बुलढाण्याचा पारा ४१.६ अंशांवर !



**जनसंचलन/ बुलढाणा**

एप्रिलच्या मध्यावरच बुलढाण्याचा पारा ४१.६ अंश सेल्सिअसवर पोहोचल्याने शहर पुन्हा उष्णतेच्या झळांनी होरपळू लागले आहे. विशेष म्हणजे, यंदा उन्हाचा कडाका नेहमीपेक्षा लवकर आणि अधिक तीव्र जाणवत असून, ही स्थिती बदलत्या हवामानासोबतच शहराच्या बदलत्या रचनेचेही द्योतक मानली जात आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार राज्यात तापमान ४० ते ४३ अंशांच्या दरम्यान राहण्याची शक्यता असून, विदर्भात उष्णतेची लाट तीव्र होण्याचे संकेत आहेत. बुलढाणा जिल्ह्यातही अलीकडील काळात तापमान चाळीशी पार करत असल्याची नोंद आहे. मात्र, स्थानिक पातळीवर परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. गेल्या दीड दशकात रस्ता रुंदीकरण आणि नागरीकरणाच्या प्रक्रियेत शहरातील वृक्षसंपदा मोठ्या प्रमाणात नष्ट झाली. परिणामी, पूर्वी थंड हवामानासाठी ओळखले जाणारे बुलढाणा आता उष्णतेच्या कचाट्यात सापडल्याची भावना नागरिकांत व्यक्त होत आहे. त्यातच सिमेंट कॉँक्रिटच्या वाढत्या जाळ्यामुळे उष्णता बेट परिणाम अधिक तीव्र झाला आहे. या प्रक्रियेत शहरातील तापमान ग्रामीण भागापेक्षा जास्त वाढते आणि रात्रीही उष्णता कमी होत नाही, असे तज्ज्ञांचे मत आहे. पूर्वी झाडांच्या आच्छादनामुळे बुलढाण्यात थंडावा जाणवत होता. मात्र आता तापमान वाढले आहे

# पैनगंगा सोसायटीवर महायुतीचे वर्चस्व; बळीराजा पॅनलचा सर्व १३ जागांवर विजय

## महाविकास आघाडीचा दारूण पराभव


**जनसंचलन/बुलढाणा**

पैनगंगा कृषक सेवा सहकारी संस्था मर्यादित, पाडळी येथील ग्रामसेवा सोसायटीच्या निवडणुकीत महायुतीने एकहाती विजय मिळवला. महायुती प्रणीत बळीराजा पॅनलने सर्वच्या सर्व १३ जागांवर दणदणीत यश मिळवले. या निवडणुकीत महाविकास आघाडीचा पराभव झाला आहे. आ. संजय गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली लढविण्यात आलेल्या या निवडणुकीत बळीराजा पॅनलने सर्व गटांमध्ये आघाडी घेतली. सर्वसाधारण गटातून जीवनकुमार कडूबा पवार, भास्कर भाऊराव रिंढे, श्रीकांत आत्माराम पवार, दौलत श्रीरंग सुरगडे, शंकर कडूबा तायडे, मोहन मोतीराम धनावत, अशोक किसन तांगडे आणि राजेंद्र नथूसिंग राजपूत १३ एप्रिल रोजी पारपडली होती निवडणूक पाडळी येथील पैनगंगा सोसायटीवर महायुतीचे सर्वच्या सर्व १३ सदस्य निवडून आले. विजयी झाले. महिला गटातून सुलोचना सारंगधर दांडगे व मंदा राजेंद्र गायकवाड यांनी विजय मिळवला. भटक्या-विमुक्त प्रवर्गातून जगदेव कडूबा नप्ते, अनुसूचित जाती प्रवर्गातून भीमराव सुखदेव जाधव, तर इतर मागास प्रवर्गातून अंबादास सखाराम पवार विजयी झाले. पार्श्वभूमीवर शिंदेसेनेच्या मातोश्री जनसंपर्क दरम्यान, या विजयाच्या बुलढाणा येथील कार्यालयात नवनिर्वाचित सदस्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास मृत्युंजय गायकवाड, ओमसिंग राजपूत, धनंजय बारोटे, अर्जुन दांडगे, शिवाजी तायडे, गजानन गायकवाड, हरिदास रिंढे, ज्ञानेश्वर पवार, भुजंगराव रिंढे, प्रा. अनिल रिंढे आदींसह पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निकालामुळे पैनगंगा सोसायटीवर महायुतीचे वर्चस्व प्रस्थापित झाले असून, पुढील काळात विकासकामांना गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# चिखलीतील करवंडमध्ये आज होणार इतिहासाचा जागर...

**बुलढाणा**

छत्रपती शिवाजी महाराज आणि करखंड (ता. चिखली) येथील महाराणी गुणवंताबाई इंगळे यांच्या ऐतिहासिक विवाह स्मृतींना यंदा ३७० वर्षे पूर्ण होत असून, त्या निमित्ताने १५ एप्रिल रोजी करवंड येथे ऐतिहासिक करवंड महोत्सव २०२६ उत्साहात साजरा केला जाणार आहे. शिवकालीन परंपरा, युद्धकला आणि इतिहासाचा जिवंत अनुभव देणारा हा महोत्सव जिल्ह्यासाठी सांस्कृतिक पर्व ठरणार आहे. महोत्सवाची सुरुवात सकाळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या अभिषेकाने होणार असून राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसलेही राहाणार उपस्थित त्यानंतर भव्य ऐतिहासिक शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत लेझीम पथके, बँड, अश्वदल, पालखी तसेच शिवकालीन वेशभूषेतील मावळ्यांचा सहभाग असेल. लाठी, तलवारबाजी, दांडपट्टा यांसारख्या युद्धकलेची प्रात्यक्षिकेही यावेळी सादर केली जाणार आहेत. दुपारच्या सत्रात शाहिरी आणि व्याख्यानांचा कार्यक्रम रंगणार आहे. शिवशाहीर प्रवीण फणसे, प्रा. यशवंत गोसावी, शाहीर विक्रांत राजपूत, रामचंद्र पाटील आणि डॉ. नम्रता



भोसले-मोहिते हे विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. मराठकालीन स्त्री सामर्थ्य ते युगपुरुष शिवराय अशा विषयांतून इतिहासाचा बहुआयामी वेध घेतला जाणार आहे. या महोत्सवाचे वैशिष्ठ्य म्हणजे, प्राचीन शस्त्रे व नाणी प्रदर्शन, पुस्तक प्रदर्शने आणि महिला बचत गटांचे स्टॉल्स. शिवरायांच्या महाराणींच्या घराण्यातील वंशजही या सोहळ्याला विशेष उपस्थित राहणार आहेत. आमदार श्वेता महाले यांनी शिवप्रेमींना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. दरम्यान, राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले हेही या महोत्सवाला उपस्थित राहणार असून त्यांच्या दौऱ्यामुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

# उद्धरली कोटी कुळे... भीमा तुझ्या जन्मामुळे !

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात, संविधानाच्या मूल्यांचा जागर घडविणाऱ्या देखाव्यांनी वेधले लक्ष

जनसंचलन/बुलढाणा

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बुलढाणा शहर अक्षरशः जय भीमच्या घोषात दुमदुमून गेले. उद्धरली कोटी कुळे.. भीमा तुझ्या जन्मामुळे, असा जयघोष, ढोल-ताशांचा कडकडाट, भीमगीतांचा नाद आणि संविधानाच्या मूल्यांचा जागर घडविणारे देखावे यामुळे शहरात दिवसभर उत्सवाचे वातावरण निर्माण झाले. १४ एप्रिल रोजी पहाटेपासूनच जयस्तंभ चौकात अनुयायांची मोठी गर्दी उसळली होती. नागरिकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. गांधी भवन येथे पारंपरिक पाळणा सोहळा उत्साहात पार पडला. या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, मुख्याधिकारी गणेश पांडे, ठाणेदार रवी राठोड, ग्रामीण ठाणेदार गजानन कांबळे यांची उपस्थिती होती. १३५ व्या जयंतीनिमित्त १३५ किलो मोतीचूर लाडूंचे वाटप करण्यात आले. यानंतर माजी सैनिक, समता सैनिक दलाच्या वतीने बाबासाहेबांना मानवंदना देण्यात आली. सकाळी गांधी भवन येथून मोटरसायकल रॅली काढण्यात आली. सायंकाळी शहरातील विविध भागातून निघालेल्या मिरवणुका एकत्र येत



जयस्तंभ चौकात भव्य स्वरूपात दाखल झाल्या. भीम रथ, संविधानाधारित जिवंत देखावे आणि आकर्षक वेशभूषेतील सहभागी यांनी मिरवणुकीची शोभा वाढवली. आबालवृद्ध, युवक-युवती आणि महिलांचा उत्स्फूर्त सहभाग लक्षवेधी ठरला. बुलढाण्यात जयस्तंभ चौकात सर्व मिरवणुका एकत्र आल्यानंतर नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने अध्यक्ष पवन भालेराव, कार्याध्यक्ष प्रशांत जाधव, सचिव विनोद इंगळे, कोषाध्यक्ष उमेश हेलोडे यांच्या नेतृत्वाखाली ११ ते १४ एप्रिलदरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये प्रा. विठ्ठल कांगणे यांचे व्याख्यान, गायक आनंद शिंदे यांचा शिंदेशाही कार्यक्रम, संतोष जोंधळे यांचे भीमगीत सादरीकरण यांचा समावेश होता. १३ एप्रिल रोजी मध्यरात्री फटाक्यांच्या आतषबाजीत करीत जयंती उत्सवाला सुरुवात करण्यात आली, तर १४ एप्रिल रोजी भव्य मिरवणुकीने उत्सवाची सांगता झाली. कार्यक्रमादरम्यान पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवत संपूर्ण सोहळा शांततेत पार पडला. ही जयंती केवळ उत्सव न राहता सामाजिक समतेचा संदेश देणारी ठरली.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | – |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | – |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


## हाणामारीत महिलांसह चौघे झाले जखमी

जनसंचलन/बुलढाणा

मशिदीत मौलानाठेवण्याच्या वादातून पिंपळगाव सराई येथे दोन गटांमध्ये हाणामारी झाली. या घटनेत महिलांसह कुटुंबीयांवर लाठ्या-काठ्यांनी मारहाण करण्यात आल्याने महिलांसह चार जण जखमी झाले आहेत. या प्रकरणी सोमवारी रायपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अलियारखा अब्दारखा पठाण (रा. पिंपळगाव सराई) यांनी रायपूर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, गावातील मशिदीत कोणता मौलाना ठेवायचा यावरून गेल्या महिन्यात त्यांचा व जावेद शाह अयुब शाह यांच्यात वाद झाला होता. याप्रकरणी यापूर्वीही पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती.दरम्यान, ७ एप्रिलला दुपारी सुमारे २ वाजताच्या सुमारास अलियारखा पठाण यांच्या सुनबाई शाहिस्ता परवीन या घरी एकट्या असताना जावेद शाह हा तेथे आला. त्याने शिवीगाळ करत तुमच्या कुटुंबीयांनी पोलिस तक्रार का केली, असा जाब विचारत चौघांनी काठ्यांनी मारहाण केली. याप्रकरणी रायपूर पोलिसांनी जावेद शाह अयुब शाह, अयुब शाह गुलाब शाह, जब्बार शाह, इलियास शाह व ननियाजअली शाह नुरअली शाह यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला.


पत्रकारीतेचा धर्म आम्ही निभावणार




सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल

वेब साईड & पोर्टल चॅनल

वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर

कुठली ही बातमी निशुल्क

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

काही तक्रार असल्यास संपर्क

शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040 पिन 443001